MHJN050004732025

**नियमित दिवाणी दावा क्र.२५/२०२५**

ताई उर्फ निता व इतर वि. विकास व इतर

## निशाणी क्र.०५ वरील आदेश

१) सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केलेला आहे.

२) मौजे आंबा, ता. परतूर, जि. जालना येथील शेतजमीन गट क्र.३०३ क्षेत्रफळ १० हेक्टर ३२ आर पैकी ०१ हेक्टर ९६ आर ज्याची चर्तु:सिमा पुर्वेस – पाराजी भेसर यांची जमीन, पश्चिमेस – अजबराव भेसर यांची जमीन, दक्षिणेस – तुकाराम माने यांची जमीन व उत्तरेस – बापुराव काळे यांची जमीन, तसेच, मौजे गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेतजमीन गट क्र.३१ क्षेत्रफळ ०३ हेक्टर ५४ आर ज्याची चर्तु:सिमा पुर्वेस – मांडकी गोपाळपूर शिव, पश्चिमेस – रोहिदास वेडेकर यांची जमीन, दक्षिणेस – बाबासाहेब वडेकर, सांडू वडेकर, दिनकर वडेकर यांच्या जमिनी व उत्तरेस – नाना भानुदास वडेकर यांची जमीन त्याचप्रमाणे, मौजे आंबा, ता. परतूर, जि. जालना येथील मिळकत क्र.२१/१ क्षेत्रफळ १७.५ x २५ फुट ज्याची चर्तु:सिमा पुर्वेस – राजराम जयवंतराव यांची जागा, पश्चिमेस – ताराचंद भेसर यांचे घर, दक्षिणेस – राजाराम जयवंतराम यांची जागा व उत्तरेस – गोविंद लक्ष्मण चे बांधकाम असलेली जागा, या वर्णन दाव्यात मिळकतींना दावा मिळकत/मिळकती असे संबोधण्यात येते.

३) अर्जदार क्र.१ चा अर्जदार क्र.२ हा मुलगा असून सध्या तो अज्ञान आहे. त्यामुळे तो सध्या अर्जदार क्र.१ कडेच राहतो. अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ची जन्म देणारी आई आहे. अर्जदार क्र.१ हिला अर्जदार क्र.२ च्या हिताविरूध्द कुठलेही हित नाही. त्या करिता प्रस्तुतचा वाद अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ च्या मार्फत दाखल करीत आहे. अर्जदार क्र.१ चा गैरअर्जदार क्र.१ हा पती असून गैरअर्जदार क्र.२ हा तिचा सासरा व गैरअर्जदार क्र.३ ही तिची सासु आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.४ ही अर्जदार क्र.१ ची नणंद असून गैरअर्जदार क्र.५ ही अर्जदार क्र.१ ची सासु आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.६ व

७ हे अर्जदार क्र.१ चे चुलत सासरे आहेत. गैरअर्जदार क्र.५ ते ७ व गैरअर्जदार क्र.२ यांचे शेत गट क्र.३१ मौजे गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे सामाईक असल्यामुळे त्या सर्वांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार केले आहे.

४) अर्जदार क्र.१ चे लग्न गैरअर्जदार क्र.१ बरोबर रितीरिवाजा प्रमाणे दिनांक २७/०३/२०२२ रोजी मौजे आंबा येथे झाले असून लग्नामध्ये तिच्या आई वडीलांनी चार तोळे सोने, कपडेलत्ते व संसार उपयोगी वस्तु दिल्या आहेत, तेव्हपासून अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची धर्मपत्नी असून आजही त्यांचे पती पत्नीचे नाते कायम आहेत. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ कडे नांदावयास गेली असता, अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार क्र.१ पासून एक मुलगा अर्जदार क्र.२ हा जन्माला आहे.

५) दावा मिळकती या अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वडिलोपार्जित हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकती असून त्या मिळकतीच्या अध्याप कुठल्याही वाटण्या झालेल्या नाहीत. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात वैचारिक मतभेद असल्यामुळे अर्जदारांनी शांततेत जगण्याच्या मुळे प्रस्तुतचा वाटणीचा वाद दाखल केला आहे. दावा मिळकत शेत गट क्र.३१ मौजे गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर क्षेत्रफळ ०३ हेक्टर ५४ आर या मिळकतीचे पुर्वीचे मालक आश्राजी भेसर यांचे वडील होते, त्यांच्या मृत्युनंतर सदरील मिळकत आश्राजी भेसर यांना आली व आश्राजी भेसर यांच्या मृत्युनंतर सदरील मिळकत वारसा आधारे प्रतिवादी क्र.२, ५ ते ६ यांच्या नावावर आली. सदरील मिळकत ही अर्जदार व गैरअर्जदार यांची वडिलोपार्जित हिंदू एकत्र कुटुंबाची मिळकत असून त्याच्या अध्याप कुठल्याही झालेल्या नाहीत. सदरील मिळकतीमध्ये गैरअर्जदार क्र.२ ताराचंद यांचा हिस्सा असून गैरअर्जदार क्र.२ ताराचंद यांच्या हिस्स्यात अर्जदारांचा हिस्सा आहे. परंतु, शेत गट क्र.३१ मौजे गोपाळपूर ही मिळकत ७/१२ उताऱ्यावर अद्यापही सामाईक क्षेत्र नमुद केलेली असल्यामुळे सदरील मिळकतीचा वाद दाखल करतेवेळी कायदेशीर अडचण निर्माण होवू नये, म्हणून ७/१२ उताऱ्यावरील सर्व मालकांना पक्षकार केलेले आहे.

६) दावा मिळकत शेत गट क्र.३०३ क्षेत्रफळ १० हेक्टर ३२ पैकी ०१ हेक्टर ९६ आर बागायती जमीन व दावा मिळकत क्र.२१/१ क्षेत्रफळ १७.५ x २५ फुट या मोजे आंबा, ता. परतूर, जि. जालना येथील मिळकती असून त्या अर्जदार व गैरअर्जदार यांच्या

हिंदू एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून विकत घेतलेल्या मिळकती आहेत. अर्जदार क्र.१ हिचे लग्न झाल्यानंतर गैरअर्जदार यांच्याकडे नांदावयास गेली असता, सुरूवातीचे चार महिने तिला चांगले नांदविले. त्यानंतर सर्व गैरअर्जदार व त्यांचे नातेवाईक अर्जदार क्र.१ हिला असे म्हणत असे की, तुझ्या आई वडीलांनी आमच्या ऐपती प्रमाणे हुंडा दिला नाहीत "धोंड्याच्या महिना आला असताना, मला तुझ्या आई वडीलांनी सोन्याचा धोंडा दिला नाही” असे म्हणून मानसिक व शारिरीक त्रास देत असत व वारंवार शिवीगाळ करत असत. तसेच, धोंडयाचा महिना संपल्यानंतर तू आमच्याकडे नांदण्यास येवू नको, असे म्हणून नेहमी मारहाण करून घराबाहेर काढून देत असत. अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदारांनी धोंड्याचा महिन्यात घराबाहेर काढून दिले होते. अर्जदार क्र.१ हिला घराबाहेर काढून दिल्यानंतर अर्जदार क्र.१ हिच्या नातेवाईकांनी मध्यस्थी करून परत अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे नांदण्यास पाठवले.

७) अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराकडे नांदत असताना, परत गैरअर्जदाराने रूपये १०,००,०००/– ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेरावरून घेवून ये, या कारणावरून त्रास देवून मानसिक व शारिरीक छळ केला. सदरील त्रासाबद्दल अर्जदार ही माहेरी आल्यानंतर तिच्या आई वडीलांना सांगत होती. अर्जदार क्र.१ हीचे आई वडील गैरअर्जदाराला वारंवार समजावून सांगत होते. परंतु, गैरअर्जदाराच्या स्वभावात कुठलाही बदल पडला नाही व शेवटी रूपये १०,००,०००/– ट्रॅक्टर घेण्यासाठी आणले, तर तुला नांदवू, असा संसार अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्यामध्ये चालु असताना, गैरअर्जदाराने एक वेळा अर्जदार क्र.१ हिला विष पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदाराकडे नांदायचे होते, म्हणून तिने कुठलीही केस केली नाही व सर्व त्रास निमुटपणे सहन करत राहिली. असे असतानाही अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार यांच्याकडे डिसेंबर २०२४ पर्यंत नांदली, त्यावेळी अर्जदार क्र.१ ही गरोदर असताना, गैरअर्जदाराने तिला मारहाण करून घराबाहेर काढून दिले. त्यानंतर परत अर्जदार क्र.१ ने जानेवारी महि१)२)३)४)५)६)७)न्यात गैरअर्जदाराकडे जावून नांदयाचा प्रयत्न केला, तरी पण त्यांनी नांदविले नाही व मारहाण करून घराबाहेर काढून दिले. त्या बद्दलच्या सदरील त्रासाबद्दलची तक्रार अर्जदार क्र.१ हिने पोलीस स्टेशन, परतूर यांच्याकडे केली असताना, त्या वरून त्यांनी गैरअर्जदाराविरूध्द गुन्हा दाखल केला असून तो सध्या प्रलंबित आहे.

८) अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराकडे नांदत असताना, गैरअर्जदार व अर्जदार यांच्यात वारंवार वाद होत होते. गैरअर्जदार हे वारंवार अर्जदार क्र.१ हिस पैश्याची मागणी करत होते. परंतु, अर्जदार क्र.१ कडे पैसे नसल्यामुळे व अर्जदार क्र.१ हिने त्यांची मागणी पूर्ण केली नाही, त्यामुळे सर्व गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ हिला घराबाहेर काढून दिले आहे. अर्जदाराचा वाद मिळकतीवर कुटुंबाचा घटक, या नात्याने आजही ताबा आहे व सदरील मिळकतीवर अर्जदाराचा कुटुंबाचा घटक म्हणून हक्क आहे. अर्जदाराचा वाद हा वाटणीचा असल्यामुळे अर्जदाराला वेगवेगळ्या मालमत्तेचा वेगवेगळ्या ठिकाणी वाटणीचे दावे देत येत नाहीत, म्हणून प्रस्तुत प्रकरणात दावा मिळकत शेतजमीन गट क्र.३१ मौजे गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर ही जमीन कोर्टाच्या कार्य क्षेत्रात येत नसली, तरी अर्जदार हे मौजे आंबा, ता. परतूर येथील रहिवाशी असून दुसरी मिळकत मौजे आंबा येथील असून ती जमीन विद्यमान कोर्टाच्या कार्यक्षेत्रात येते. त्यामुळे वाटणीचा दावा एकच देत असल्यामुळे दावा मिळकत शेतजमीन गट क्र.३१ मौजे गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर विषयी सदरील वाद चालविण्याचा व निकाली काढण्याचा अधिकार विद्यमान कोर्टाला आहे.

९) गैरअर्जदार हे वाद मिळकती ७/१२ उताऱ्यावर स्वत:च्या नावे असल्याचा गैरफायदा घेवून अर्जदाराला हिस्सा मिळू नये, म्हणून व अर्जदारास हिस्सा मिळण्यास अडचणी व्हाव्यात, या हेतूने सदरील मिळकती इतरांना हस्तांतरित करण्याच्या तयारीत आहेत. तसे झाल्याचे अर्जदाराचे न भरून येणारे नुकसान होवू शकते व अर्जदाराला तांत्रिक अडचणी येवू शकतात. अर्जदार व गैरअर्जदार यांचे आपसात वारंवार वैचारिक मतभेद आहेत. त्यामुळे अर्जदाराने भविष्यातील जिवन शांतते जगावे, या हेतुने वाद मिळकतीच्या सरस निरस हालके भारी हिस्से करून मिळणेसाठी गैरअर्जदारांना विनंती केली. परंतु, गैरअर्जदारांनी अर्जदारास हिस्से करण्यास टाळाटाळ केली व गैरअर्जदारांनी अर्जदारास अशी धमकी दिली की, दावा मिळकतीच्या नोंदी गैरअर्जदाराच्या नावे ७/१२ उताऱ्यावर असल्यामुळे त्या गोष्टीचा गैरफायदा घेवून दावा मिळकती इतरांना हस्तांतरीत करण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे अर्जदाराला दावा मिळकतीमध्ये हिस्सा मिळेपर्यंत गैरअर्जदार अथवा त्याच्या प्रतिनिधींना दावा मिळकती इतर कोणालाही हस्तांतरित अथवा विक्री करू नये, असा कायमचा मनाई हुकुम मिळणेकरिता दाखल केला आहे.

**१०)** निशाणी क्र.२४ नुसार प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दाव्याचे लेखी जबाब सादर केले असून सदर लेखी जबाब हे प्रस्तुत मनाई हुकुम अर्जाचे म्हणणे समजण्यात यावे, या बाबत निशाणी क्र.२६ नुसार पुरशिस दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी लग्न व नातेसंबंध मान्य करून त्यांचेविरुध्द दाव्यात केलेले इतर आरोप नाकारले आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत मौजे आंबा, ता. परतूर येथील शेतीजमीन गट क्र.३०३ क्षेत्रफळ ०१ हेक्टर २१ आर, या मिळकतीचे पुर्वीचे मालक व काबीज काशिनाथ पुंजाराम काळे हे होते. त्यांनी त्यांची वरील नमुद मिळकत त्यांचे शास्त्रीय गरजेसाठी दिनांक ०६/०५/२००० रोजी प्रतिवादी क्र.२, प्रतिवादी क्र.७ व एकनाथ पाराजी भेसर यांना खरेदीखत क्र.१५६८/२००० आधारे विक्री केली आहे. प्रतिवादी क्र.२ व ७ यांनी सदरची मिळकत स्वत: स्वतंत्र उत्पन्नातून खरेदी केली होती.

**११)** तसेच, दिनांक ०४/१०/२००८ रोजी गट क्र.३०३ क्षेत्रफळ ३६ आर व ४० अशी एकूण ७६ आर ही मिळकत प्रतिवादी क्र.२ व ७ यांनी पाराजी आश्राजी भेसर यांचे कडून स्वत: स्वतंत्र उत्पन्नातून खरेदी केलेली मिळकत आहे. अशाप्रकारे प्रतिवादी क्र.२ व ७ हे दावा मिळकत शेतजमीन गट नंबर ३०३ क्षेत्रफळ ०१ हेक्टर ९६ आर मौजे आंबा, ता. परतूर चे मालक व काबीज असल्यामुळे व त्यांना किडनीचा आजार झाला असल्यामुळे त्यांना दैनंदिन औषधोपचार व रूग्णालयाचा खर्च भागविण्यासाठी त्यांनी दावा मिळकत शेतजमीन गट क्र.३०३ मधील क्षेत्रफळ ०१ हेक्टर ९६ आर ही मिळकत दिनांक १७/०६/२०२५ रोजी रोहिदास हरिभाऊ हिरडे रा. गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांना रक्कम रूपये १८,००,०००/– चे मोबदल्यात विक्री केली असून त्या बाबतचे खरेदीखत क्र.१८९२/२०२५ सदरील रोहिदास हरिभाऊ हिरडे यांचे हक्कात प्रतिवादी क्र.२ यांनी लिहून दिले आहे. त्यामुळे दिनांक १७/०६/२०२५ पासून वरील नमुद मिळकतीचा मालक व काबीज रोहिदास हरिभाऊ हिरडे हा झाला आहे. वादीने दावामध्ये सदरील खरेदीखत क्र.१८९२/२०२५ आव्हानित केले नसल्यामुळे व रोहिदास हरिभाऊ हिरडे यांना या दाव्यात पक्षकार केले नसल्यामुळे वादीचा दावा कायदेशीरदृष्ट्या दुषित होत आहे.

**१२)** तसेच, प्रतिवादी क्र.२ यांनी घर नंबर २९ ज्याचा नगर रचना क्र.२१/१ ग्रामपंचायत आंबा, ता. परतूर ज्याची लांबी पुर्व–पश्चिम २५ व दक्षिण उत्तर १७.५ फुट ही

मिळकत राजाराम जयवंता बोनगे यांचेकडून रक्कम रूपये ३५,०००/– च्या मोबदल्यात खरेदी केली असून सदरील मिळकत खरेदी करण्यासाठी प्रतिवादी क्र.२ ने त्याचे स्वतंत्र उत्पन्नातून रक्कम१)२)३)४)५)६)७)८)९)१०)११)१२) दिली आहे. तसेच, दावा मिळकत गट क्र.३१ क्षेत्रफळ ०३ हेक्टर ५४ आर मौजे गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर ही मिळकत प्रतिवादी क्र.२ चे वडील आश्रोबा उर्फ आश्राजी नाथुजी भेसर यांनी त्यांचे स्वतंत्र उत्पन्नातून खरेदी केलेली मिळकत आहे. परंतु, सदरील मिळकत ही सन १९४७ पुर्वी खरेदी केली असल्यामुळे व त्यावेळचे खरेदी बाबतचे कोणतेही दस्तावेज सध्या जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबत प्रतिवादी आज रोजी सदरील मिळकत खरेदी केल्याचे दस्तावेज दाखल करू शकत नाही. परंतु, प्रतिवादी सदर मिळकत ही आश्राजी नाथु यांची स्वकष्टार्जित मिळकत होती, या बाबतचे दस्तावेज भविष्यात दाखल करणार आहे. असे असले तरी, सदरची मिळकत ही आश्रोबा उर्फ आश्राजी नाथु यांचे मृत्यूनंतर फेरफार क्र.३१६ आधारे वारसा आधारे मिळालेली मिळकत असल्यामुळे सदरची मिळकत ही प्रतिवादींची स्वतंत्र मिळकत आहे.

**१३)** त्याचप्रमाणे, मुळातच वादी क्र.१ यांना ती प्रतिवादींच्या कुटुंबाची सह भागिदार नसल्यामुळे वादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र.१ यांचे ह्यातीमध्ये वाटणी मागण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होत नाही. मुळातच वरील नमुद दावा मिळकती, ह्या प्रतिवादींच्या स्वतंत्र व स्वकष्टार्जित मिळकती असल्यामुळे वादींना सदरील मिळकतीमध्ये वाटणी मागण्याचे कोणतेही कायदेशीर हक्क प्राप्त होत नाहीत. वादींनी मुळ दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ यांचे नावे असलेली घर नंबर ३१ ज्याची पुर्व–पश्चिम लांबी २८ फुट व रूंदी दक्षिण उत्तर १८ फुट ही मिळकत समाविष्ट केलेली नाही. त्यामुळे सदरचा दावा कायदेशीररित्या दुषित होत आहे. वरील नमुद कारणांस्तव अर्जदारांचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा, अशी विनंती केली.

**१४)** प्रतिवादी क्र.५ ते ७ यांना दावा समन्सची बजावणी होवून देखील त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे विहीत मुदतीत सादर केले नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण त्यांचेविरूध्द एकतर्फा चालविण्यात येत आहे.

**१५)** वादी व प्रतिवादींचे परस्पर विरोधी कथने लक्षात घेता, कागदपत्रांची

पाहणी करता व युक्तीवाद ऐकता, पुढील मुद्दे माझे समक्ष उभे राहतात, त्यावर मी माझे कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींच्या बाजुने सकृतदर्शनी केस आहे काय ? | ... अशंत होय. |
| २) | अनुकुलतेचा समतोल कोणाचे बाजुने आहे ? | ... अंशत वादीच्या बाजुने |
| ३) | अपरिमित हाणी कोणाची होईल ? | ... अंशत वादीच्या बाजुने |
| ४) | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

१६) दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एल. लिंबुळकर यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकती असून प्रतिवादी क्र.१ हा वादीचा पती असून वादी ही वादी क्र.२ ची अपाक आई असून वादी क्र.२ चे हितात तिने सदरचा दावा दाखल केलेला आहे. तसेच, प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या रेकॉर्डला त्यांच्या नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून दावा मिळकती विक्री करू पाहत आहे, असे झाल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल. त्यामुळे सदरचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

१७) उलटपक्षी, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विधिज्ञ श्री. जे. पी. बागल यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकती या प्रतिवादींच्या स्वकष्टार्जित मिळकती असून त्यामध्ये वादीचा काहीही संबंध नाही. तसेच, सदरचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज मान्य झाला, तर प्रतिवादींना त्यांच्या मिळकती स्वतंत्रपणे उपभोगता येणार नाही. म्हणून सदर मिळकतीमध्ये वादीचा काहीएक हक्क व हितसंबंध नसल्यामुळे वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस नसून सदरचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज त्यांनी नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

१८) कायद्याची स्थापित स्थिती अशी आहे की, तात्पूरत्या मनाई हुकूमाकरीता प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असून मनाई हुकूम न मिळाल्यास त्यात त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. या तिनही बाबी वादी यांनी सिध्द करणे

गरजेचे आहे.

**१९)** वादींनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यामधील कागदपत्रे –

i) मौजे आंबा येथील गट क्र.३३ चा ७/१२ उतारा

i) मौजे गोपाळपूर येथील गट क्र.३१ चा ७/१२ उतारा

iii) ग्रामपंचायत आंबा यांनी दिलेला नमुना नंबर ८–अ चा उतारा

iv) ग्रामपंचायत आंबा यांनी दिलेले मुल्यांकन पत्रक

v) खरेदीखत क्र.१८९२/२०२५ ची छायांकित प्रत

vi) खरेदीखत क्र.१८९२/२०२५ ची प्रत

vii) मौजे आंबा येथील फेरफार क्र.२४, ८८०, ५२३ ची प्रत

viii) मोजे गोपाळपूर येथील फेरफार क्र.३१६ ची प्रत

**२०)** प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यामधील कागदपत्रे –

i) खरेदीखत क्र.१५६८/२००० ची प्रत

ii) खरेदीखत क्र.११४३/१९६९ ची प्रत

iii) खरेदीखत क्र.१९०३/२००८ ची प्रत

iv) मौजे आंबा येथील फेरफार क्र.२४, ८८०, ५२३ ची प्रत

v) तसेच, निशाणी क्र.२९ लगत प्रतिवादी क्र.२ ताराचंद भेसर यांचे वैद्यकिय कागदपत्रे

**२१)** सदरच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, दावा मिळकत गट क्र.३०३ चा, जो ७/१२ उतारा दाखल केला आहे, त्या ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्र.२ चे नावे क्षेत्रफळ १ हेक्टर ९६ आर एवढ्या जमिनीवर फेरफार क्र.८८० अन्वये लावण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मी फेरफार क्र.८८० चे अवलोकन केले. फेरफार क्र.८८० नुसार दावा मिळकत गट क्र.३०३ मध्ये पाराजी आश्राजी भेसर यांनी अजबराव आश्राजी भेसर यांना ३६ आर व तारांचद आश्राजी भेसर यांना देखील त्यांच्या मालकीचे क्षेत्र ४० आर अशी एकूण ७६ आर जमीन विक्री केलेली आहे. म्हणजेच

फेरफार क्र.८८० अन्वये प्रतिवादी क्र.२ हा ४० आर इतक्या जमिनीचा मालक झाला पाहिजे होता. परंतु, त्या अनुषंगाने ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले, तर प्रतिवादी क्र.२ च्या फेरफार क्र.८८० अन्वये गट क्र.३०३ मध्ये १ हेक्टर ९६ आर मिळकत आल्याचे दिसून येते. म्हणजेच ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्र.२ चे नावे असलेले क्षेत्रफळ व फेरफार क्र.८८० अन्वये प्रतिवादी क्र.२ ला विक्री केलेले क्षेत्रफळ यामध्ये तफावत दिसून येते. तसेच, फेरफार क्र.८८० अन्वये प्रथमदर्शनी असेच दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ ला प्रतिवादी क्र.६ ने त्याच्या नावावर व मालकीची असलेली जमीन विक्री केलेली आहे. त्यामुळे सदरची जमीन वडिलोपार्जित जमीन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

२२) तसेच, सदर दावा मिळकत गट क्र.३०३ बाबत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी जे म्हणणे दाखल केले आहे व त्या अनुषंगाने जे कागदपत्रे दाखल केलेले आहे, त्याचे सुध्दा मी बारकाईने अवलोकन केले आहे. दावा मिळकत गट क्र.३०३ बाबत प्रतिवादींनी असे म्हटले आहे की, सदर दावा मिळकत गट क्र.३०३ मध्ये १ हेक्टर २१ आर मिळकत, त्या मिळकतीचे पुर्वीचे मालक व काबीज काशिनाथ पुंजाराम काळे यांनी त्याच्या शास्त्रीय गरजेसाठी दिनांक ०६/०५/२००० रोजी ती मिळकत प्रतिवादी क्र.२, प्रतिवादी क्र.७ व एकनाथ पाराजी भेसर यांना खरेदीखत क्र.१५६८/२००० अन्वये विक्री केलेली होती. त्य अनुषंगाने मी प्रतिवादींतर्फे दाखल खरेदीखत क्र.१५६८/२००० चे अवलोकन केले. सदर खरेदीखत हे नोंदणीकृत खरेदीखत असून सदर खरेदीखतावरून प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की, दिनांक ०३/०८/२००० रोजी एकनाथ पाराजी भेसर, अजबराव आश्राजी भेसर व ताराचंद आश्राजी भेसर यांनी रक्कम रूपये ९५,०००/– देवून सदरची मिळकत ही काशीनाथ पुंजाराम काळे यांचेकडून खरेदी घेतलेली आहे.

२३) वादीतर्फे दाखल फेरफार क्र.८८० तसेच, प्रतिवादींतर्फे दाखल खरेदीखत चे अवलोकन केले असता, असेच दिसून येते की, दावा मिळकत गट क्र.३०३ ही प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत नाही.

२४) वादीने घर मिळकत क्र.२१/१ ही मिळकत देखील प्रतिवादींच्या हिंदु एकत्र कुटुंबाची खरेदी घेतलेली मिळकत असून त्या मिळकतीचे हस्तांतरण सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी करू नये, अशी मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने मी वादीतर्फे दाखल मिळकत क्र.२१/१ च्या नमुना नंबर ८–अ च्या उताऱ्याचे अवलोकन

केले असता, सदरच्या उताऱ्यावर मालक, या सदरी प्रतिवादी क्र.२ चे नाव असल्याचे दिसून येत आहे. वादीने सदर ठिकाणी सदरच्या घर मिळकतीचे खरेदीखत अभिलेखावर दाखल करणे अभिप्रेत होते. परंतु, वादीने तसे कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाही. तसेच, वादीच्या म्हणण्यानुसार सदरची मिळकत ही हिंदु एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून खरेदी घेतलेली मिळकत आहे. परंतु, असा कोणताही पुरावा वादीने अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादीने केवळ सदरची मिळकत ही हिंदु एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून केल्याचे तोंडी कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचे जे म्हणणे दाखल केलेले आहे, त्यामध्ये प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, सदरची मिळकत प्रतिवादी क्र.२ याने राजाराम जयवंता बोणगे यांचेकडून रक्कम रूपये ३५,०००/– च्या मोबदल्यात खरेदी केली असून सदरची खरेदी ही प्रतिवादी क्र.२ यांनी त्याच्या स्वत:च्या उत्पन्नातून खरेदी केलेली आहे. परंतु, प्रतिवादींनी देखील त्या बाबतचे खरेदीखत किंवा इतर कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी देखील केवळ तोंडी कथनच केलेले दिसून येते.

**२५)** अशा परिस्थितीत अपरिमित नुकसान कोणाचे होवू शकते, ही बाब या ठिकाणी विचारार्थ घेणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी सदर घर मिळकतीचा मालक व कब्जेदार प्रतिवादी क्र.२ हाच असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतु, सदरची मिळकत ही प्रतिवादी क्र.२ ने एकत्र हिंदु कुटुंबाच्या उत्पन्नातून घेतली किंवा कसे, ही बाब सदरचा दावा गुणदोषाराव चालल्यावरच समजु शकते. परंतु, दाव्याचा निकाल लागण्यासा बऱ्याच कालावधी जाणार असून प्रतिवादी क्र.२ ने जर सदरची मिळकत विक्री केली, तर वादी क्र.१ व २ चे अपरिमित असे नुकसान होवू शकते. तसेच, भविष्यात सदर दाव्यामध्ये गुतांगुत वाढू शकते. त्याचप्रमाणे भविष्यातील दावे, प्रतिदावे व दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी सदरच्या मिळकतीबाबत वादीच्या पक्षात तुर्तातुर्त मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होवू शकते.

**२६)** मी या ठिकाणी दलपत कुमार व इतर विरुध्द प्रल्हाद सिंग व इतर (ए.आय.आर १९९३ एससी २७६) या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यानिर्णयावर विसंबून राहते.

Hon'ble Supreme Court observe that it is settled law that grant of injunction is a discretionary relief. The exercise thereof is subject to the Court satisfying that,

1. There is serious disputed question to be tried in the suit and that an act, on the facts before the Court, there is probability of his being entitled to the relief asked for by the plaintiff or defendant,

2. The Courts interference is necessary to protect the party from species of injury. In other words irreparable injury or damage would ensue before the legal right would be established at the trial and

3. The comparative hardship or mischief of inconvenience which is likely to occur from withholding the injunction will be greater than that would be likely to arise from granting it.

२७) प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने दावा मिळकत गट क्र.३१ या मिळकतीबाबत देखील तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याची मागणी केलेली आहे. वादीच्या कथनानुसार दावा मिळकत गट क्र.३१ क्षेत्रफळ ०३ हेक्टर ५४ आर ही प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत आहे. त्या अनुषंगाने मी गट क्र.३१ च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले. त्यामध्ये प्रतिवादी क्र.२, ५, ६ व ७ यांची नावे मुळ पुरूष आश्राजी भेसर हा मयत झाल्यानंतर वारस म्हणून फेरफार क्र.३१६ अन्वये लागल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने मी फेरफार क्र.३१६ चे अवलोकन केले असता, सदर फेरफार नुसार मुळ पुरुष आश्राजी भेसर हा मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र.२, ५, ६ व ७ यांची नावे सदर दावा मिळकतीच्या रेकॉर्डला लावल्याचे दिसून येते. म्हणजेच वादीचे कथन की, सदर दावा मिळकत ही प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत आहे, हे कथन प्रथमदर्शनी सत्य असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे, सदर मिळकतीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांनी जे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, सदरची मिळकत प्रतिवादी क्र.२ चे वडील आश्राजी भेसर यांनी त्यांनी त्यांच्या स्वतंत्र उत्पन्नातून खरेदी केलेली असल्याचे म्हटलेले आहे. परंतु, तसे कोणतेही कागदपत्र प्रतिवादींनी अभिलेखावर दाखल केलेले नाही. उलटपक्षी, वादीने त्याबाबतचे कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे.

२८) वादी व प्रतिवादींचे विधिज्ञ यांनी मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत. सदर न्यायानिर्णयांचे मी सखोल वाचन

केले. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या तर्फे दाखल न्यायनिर्णय हे एकत्र हिंदु कुटुबांच्या मिळकतीबाबत तसेच, हिंदु व्यक्तीचे स्वकष्टार्जित मिळकत असेल व तो कोणतेही इच्छा प्रकट न करता, मृत्यु पावल्यास ती मिळकत त्याच्या क्लास–१ उत्तराधिकारांनी जाते व ती त्यांची स्वतंत्र मिळकत होते, या आशयाचे मा. कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय दिलेला आहे. परंतु, सदर दावा हा आणखी सुरूवातीचे स्टेजला असून त्यामध्ये प्रतिवादी क्र.२ चे वडील यांची सदर मिळकत ही स्वकष्टार्जित होती किंवा कसे व ते कोणतीही इच्छा प्रकट न करता, मृत्यू पावले किंवा कसे, ही बाब न्यायालयासमोर आणखी सिध्द झालेली नाही. त्यामुळे सदर न्यायनिर्णयावरती, मी या ठिकाणी विसंबुन राहू शकत नाही.

२९) तसेच, प्रतिवादींतर्फे दाखल मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांचे देखील मी सखोल वाचन केले. परंतु, प्रतिवादींतर्फे त्यांच्या लेखी म्हणण्यानुसार दावा मिळकतीला प्रतिवादी क्र.२, ७ व एकनाथ पाराजी भेसर यांनी त्यांच्या स्वतंत्र उत्पन्नातून खरेदी केलेल्या मिळकती असून त्या प्रतिवादींच्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या मिळकती नाहीत. तसेच, सदर न्यायनिर्णयामध्ये, हिंदु वारसा कायद्याचे कलम ८ नुसार मुलाला त्याच्या वडीलांकडून वारसाहक्काने मिळालेली मिळकत ही त्याची स्वतंत्र मिळकत असते व त्या मिळकतीला एकत्र हिंदु कुटुंबाची मिळकत हा दर्जा राहत नाही, असे म्हटले आहे. दावा मिळकत घर मिळकत २१/१ च्या ८–अ च्या उताऱ्याचे बारकाईने अवलोकन केले असता, त्यावर फक्त प्रतिवादी क्र.२ चेच नाव दिसत आहे. परंतु, दाव्यातील कथने व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, आश्राजी भेसर यांना प्रतिवादी क्र.२, ४, ५, ६ व ७ हे अपत्य असून सदर दावा मिळकतीवर त्यांची नावे दिसून येत नाही. त्यामुळे सदरची मिळकत ही कशा पध्दतीने प्रतिवादी क्र.२ च्या नावे आली आहे, हे या ठिकाणी स्पष्ट होत नाही. त्यामुळे मी सदर न्यायनिर्णयावर विसंबुन राहू शकत नाही. तसेच, प्रतिवादींतर्फे दाखल मा. पंजाब ॲन्ड हरियाणा उच्च न्यायालयाचा जो न्यायनिर्णय दाखल केला आहे, तो एकत्र हिंदु कुटुंबांच्या मिळकतीबाबतचा असून प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार दावा मिळकती, या प्रतिवादींच्या स्वतंत्र उत्पन्नातून घेतलेल्या आलेले आहेत, असेच कथन केलेले असल्यामुळे सदर न्यायनिर्णय, या ठिकाणी लागू पडत नाही.

३०) वादींतफे दाखल न्यायनिर्णयाचे देखील मी सखोल वाचन करून, सदर न्यायनिर्णय, या ठिकाणी विचारात घेण्यात आले आहे.

**३१)** उपरोक्त चर्चिले प्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे मार्फत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केल्यावरुन एकंदरीत असे दिसून येते की, दावा मिळकत गट क्र.३०३ ही प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत नाही. तसेच, दावा मिळकत गट क्र.३१ ही प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत आहे. त्याचप्रमाणे, वर चर्चील्याप्रमाणे दावा मिळकत घर मिळकत नंबर २१/१ या बाबत दाव्याचा निकाल लागेपर्यंत तुर्तातुर्त मनाई हुकुम देणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, दावा मिळकत गट क्र.३१ व घर मिळकत नंबर २१/१ बाबत तुर्तातूर्त मनाई हुकुमाचा आदेश वादीचे बाजुने दिला गेला नाही, तर वादीचे अपिरिमित नुकसान होऊ शकते. या उलट तूर्तातूर्त मनाई हुकूम मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल हा वादीचे बाजुने झुकत आहे.

**३२)** वरील सर्व बाबींचा विचार करुन मी मुद्दा क्र.१ ते ३ यांचा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) सदरचा तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्ज निशाणी क्र.०५ अंशत: मंजूर करण्यात येत असून दावा मिळकत गट क्र.३१ मोजे गोपाळपूर, ता. जि. छत्रपती संभाजी नगर व घर मिळकत क्र.२१/१ मौजे आंबा, ता. परतूर, जि. जालना ह्या मिळकती प्रस्तुत दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी कोणासही हस्तांतरण अथवा विक्री करु नये, असा तुर्तातूर्त मनाई आदेश देण्यात येत आहे.

२) दावा मिळकत शेत गट क्र.३०३ मौजे आंबा, ता. परतूर, जि. जालना, या बद्दल तात्पुरता मनाई हुकुम नाकारण्यात आला आहे.

३) खर्चाची बाब दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळेस विचारात घेण्यात येईल.

Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2025.11.11 11:43:56 +0530

ठिकाण : परतूर (व्ही. बी. डोंबे )

दिनांक : ०५/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

**परतूर**

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M. D. Adhe |
| Name of Court | : | JMFC Court, Partur. |
| Judgment dictated on | : | Direct Computer |
| Transcript ready on | : | 05.11.2025 |
| Judgment Signed by | | |
| Presiding Officer on | : | 10.11.2025 |
| Judgment uploaded on | : | 11.11.2025 |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MADHAV DEVIDAS ADHE
Date: 2025.11.11 11:52:52 +0530

(Madhav. D. Adhe)
Stenographer Grade-3